## नि. दि. दा. क्र. ३६२/२०१६ मधील नि. ३३ वरील आदेश

## ( चिन्मय मगदूम वि. महादेव मगदूम व इतर )

१. प्रस्तुतच्या अर्जाअन्वये प्रतिवादी नं. १ ते ८ यांनी त्यांचेविरुध्द झालेला "उलटतपास नाही" चा आदेश रद्दबातल करण्यची विनंती केली आहे.

२. प्रतिवादींच्या अर्जामधील कथन असे की, वादी यांनी नि.२१ वर सरतपास नोंदवल्यानंतर प्रस्तुतचे काम वादी यांच्या उलटतपास येणेवर होते. प्रतिवादी हे यांनी वकील बदलल्यामुळे व त्यांच्या नवीन वकीलांना प्रस्तुत कामाची पुरेशी माहिती व कागदपत्रे मिळाली नाहीत. दरम्यान प्रतिवादींविरूध्द "उलटतपास नाही" असा आदेश झाला आहे. प्रतिवादी यांनी वादीचा उलटतपास घेण्यास जाणूनबुजुन दिरंगाई केली नाही. त्यामुळे प्रतिवादीनी त्यांच्याविरुदध झालेला "उलटतपास नाही" चा आदेश न्यायाचे हेतूस्तव रद्द करणेबाबत विनंती केली आहे.

३. वादी यांनी नि. ३५ वर स्वतःचे म्हणणे दाखल करून अर्जास विरोध दर्शविलेला आहे. वादीच्या कथनानुसार त्यांनी दि.१७/१२/२०१२ रोजी सरतपासाचे ॲफिडेव्हीट दाखल केले असून प्रतिवादींनी जाणूनबुजुन उलटतपास घेण्यास टाळाटाळ केली आहे. प्रतिवादीनी वादीचे काम लांबणीवर पाडणेच्या उद्देशाने उलटतपास घेतलेला नाही. प्रतिवादीनी दिलेले कारण संयुक्तीक नाही. सबब, अर्ज नामंजूर करण्याची विनंती वादीने केली आहे.

४. वादी व प्रतिवादीच्या वकीलांचा युक्तीवाद ऐकला.

५. अर्ज वाचला. अर्जामधील कथनानुसार वादीने दावा हा तुटक वाटप होवून कब्जेकरीता, मनाईकरीता व डिक्लेरेशनकरीता दाखल केलेला आहे. त्यानुसार वादीने त्यांचे सरतपासाचे शपथपत्र दाखल केले. प्रतिवादींच्या म्हणण्याप्रमाणे त्यांनी वकील बदलल्यामुळे व त्यांच्या नवीन वकीलांना प्रस्तुत कामाची पुरेशी माहिती व कागदपत्रे मिळाली नाहीत. त्यामुळे दरम्यानच्या काळात त्यांच्याविरूध्द "उलटतपास नाही" चा आदेश झालेला आहे. प्रतिवादी हे उलटतपास घेण्यास तयार होते व आहेत. सदर

अर्जास वादी यांनी विरोध दर्शविलेला असून अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे. प्रतिवादीने वादीचा उलटतपास घेतल्यास मूळ वादातील निर्गती होण्यास मदत होणार असल्याने न्यायाचे हेतूस्तव प्रतिवादीचा अर्ज मंजूर करणे योग्य वाटते. तथापी, प्रतिवादीने सदरचा अर्ज जवळजवळ सहा महिन्यांच्या विलंबाने दाखल केलेले आहे. त्यामुळे झालेल्या विलंबाकरीता प्रतिवादीला रक्कम रु.७००/– चा खर्च लावणे जरूरीचे वाटते. सबब, हे न्यायालय खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## <u>आदेश</u>

१. प्रतिवादीचा अर्ज रक्कम रु.७००/– (अक्षरी रु. सातशे मात्र) चा खर्च भरणेच्या अटीवर मंजूर करणेत येत आहे.

२. प्रतिवादीने वरिल खर्च वादी यांना पुढील तारखेदिवशी अगर तारखेपूर्वी देणेचा आहे. या अटीची पूर्तता न झालेस प्रतिवादी विरुध्द योग्य ते आदेश पारित होतील.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by Urmila Parashram Koli
Date: 2021.01.08 15:13:59 +0530

मिरज. ( यु. पी. कोळी )

दि. ०७/०१/२०२१ २रे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, मिरज.

## <u>CERTIFICATE</u>

I affirm that, the contents of this P.D.F. file Judgment/Order are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | K. U. Nadaf |
| Court | : | II[nd] Jt.C.J.J.D. & J.M.F.C., Miraj. |
| Judgment/Order signed by the Presiding Officer on | : | 07/01/2021 |
| Judgment/Order uploaded on | : | 08/01/2021 |